
ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
REVIEW OF RESEARCH

# लोकशाही आदर्शवाद : महात्मा गांधी



**प्रा. डॉ. डि. एस. आठवले**
**सहा. प्राध्यापाक, राज्यशास्त्र विभाग ,**
**श्रीमती कोकीळाबाई गावंडे महिला महा., दर्यापूर.**

## प्रस्तावना :-

गांधीजींचा जीवनविषयक दृष्टिकोन अतिशय वयपक स्वरूपाचा होता. त्यांनी शास्त्रीय स्वरूपाचे राजकीय तत्वज्ञान मांडले नसले तरी त्यांनी जीवराच्या सुसंगत अशा तत्वज्ञानाची रचना केली. वास्तविकतः आर्थिक दृष्टीकोनातून गांधीजी अर्थतज्ञ नसले तरीही आर्थिक विचारात त्यांनी मांडलेली विश्वस्त कल्पना, विक्रेंद्रीकरण, सर्वोदय आणि ग्रामस्वराज्य अशा कल्पना आजच्या भारतीय अर्थव्यवस्थेलाही तितक्याच परिणामकारक वाटतात.

गांधीजींच्या उदात्त आणि भव्य अशा मानवतेच्या तत्वाचे अध्ययन केले असता त्यांच्या समाजवादी लेखनीची प्रभावी प्रचिती येते. कारण समाजाचे नैतिक कल्याण हा त्यांच्या विचारांचा मूलगाभा आहे आणि हे नैतिकतेचे असणारे प्रतिष्ठान संपूर्ण विश्वास आदर्शवत वाटते. कारण आजच्या "अर्थ" धिष्ठीत व्यवस्थेचा गांधीजींनी नीतिशास्त्राशी संबंध जोडला. आणि म्हणूनच शोषण केलेल्या श्रमाद्वारे (Sweated labour) उत्पादीत केलेल्या वस्तूची खरेदी करणे किंवा तिचा वापर करणे हे अनैतिक आहे इतकेच नव्हे तर जे अर्थशास्त्र एखाद्या व्यक्तीच्या, राष्ट्राच्या नैतिक कल्याणाचा विचार करीत नसेल तर ते अनैतिक आहे. असा आगळावेगळा आदर्शवाद मांडला.

गांधीजींनी राष्ट्राला दिलेल्या या सामाजिक, आर्थिक, नैतिक देणगीचा प्रत्यक्षात साकार होण्यासाठी त्या राष्ट्राची शासनपद्धती ही तितकीच दर्जेदार असली पाहिजे. म्हणूनच गांधीजींच्या आदर्श लोकशाहीची संकल्पना समजावून घेणे क्रमप्राप्त ठरते.

## गांधीचे - आर्थीक लोकशहीचे स्वरूप

गांधीजींनी लोकशहीत आर्थिक विकेंद्रीकरणचा पुरस्कार केला आहे. त्यात त्यांनी अवजड आणि मोठ्या उद्योगधंद्यांना विरोध केला. कारण अवजड यंत्रामुळे यंत्राचे केंद्रीकरण हाऊन परस्परावलंबन वाढते. परिणामस्वरूप आर्थिक विष्मता मोठ्या प्रमाणावर वाढते. म्हणून गांधीजींनी लाहन आणि कुटीरोद्योगांवर अधिक भर दिला आहे. उद्योगधंदे असे असावेत की ज्यामध्ये जास्तीत जास्त श्रमशक्ती आणि कमीत कमी भंडवल शक्ती लागावी. कवेळ नफा मिळविणे हे उद्योगधंद्याचे वैशिष्ट्ये असू नये अशी त्यांची धारण होती.

महात्मा गांधीचा मोठ्या उद्योगधंद्यांना तात्वीक विरोध असला तरी अंशतः निवडक मोठे उद्योग त्यांना मान्य होते. परंतु त्यासाठी अट म्हणजे मोठ्या उद्योगांच्या स्थपनेमुळे लहान उद्योग नष्ट होऊ नयेत. याची दक्षता घेतली जावी. असा त्यांचा आग्रह होता. गांधीजींच्या अर्थरचनेत यंत्रनिषेध नाही, यांत्रिकीकरणाला विरोध नाही, समृद्धीचाही निषेध नाही, पण जीवनाची समृद्धी जीवराच्या व्यापकतेने मर्यादित व्हावी, विज्ञानाच्या रथला बाजाराचा घेडा जोडला जावु नये व विज्ञानाच्या प्रगतीची परिणती मानवी बंधुत्वाच्या स्थपनेत व्हावी, ही त्यांची आकांक्षा होती. म्हणून अर्थविज्ञान हे स्वार्थ विज्ञान होवू नये, अर्थकारण अनार्थाचे मूळ ठरू नये असा इशारा गांधींनी दिला होतो. गांधींचा सर्व यंत्रांना विरोध नव्हता तर यंत्राच्या विवेकपूर्ण वापार व्हावा, यावर गांधीजींचा भर होता. आणि म्हणून, "I am aiming not at the eradication of all machinery but limitation. " असे ते म्हणत.

माणसाला मदत करणारी यंत्रे त्यांच्या रचनेत बसत होती, पण यंत्रांनी माणसांना प्रस्थापित करावे याला त्यांचा विरोध होता. कारण मानवी वैफल्य, हिंसा व युद्ध यासाठी आधुनिक तंत्रविषयक नागरिकीकरण कारणीभूत ठरते. यामुळे मानवाच्या भौतिक गरजा अधिक गतीने वाढत जातात. म्हणूनच मानवी श्रमावर प्रतिकुल परिणाम कारणाऱ्या बेराजगारी वाढवण्यास कारणीभूत ठरणाऱ्या केंद्रीकरणाला चालना

देणाऱ्या मोठ्या उद्योगांबाबत व त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या यंत्रास गांधीजींचा विरोध होता. यासाठी ग्रामोद्योगांना सरंक्षण दिले पाहिजे असे ते म्हणत. ग्रामोद्योग मूलक ग्रामस्वराज्य त्यांना अभिप्रेत होते. म्हणूनच मोठ्या उद्योगांऐवजी उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्याचे प्रतिप्रादन त्यांनी केले.

### लोकशाही संकल्पना -

गांधीजींच्या मते, "सर्वसामान्य लोकांच्या हातात सतत सुपूर्द करणारी शसनपद्धती म्हणजे लोकशही होय. लेकांच्या योग्य प्रतिनिधींकडून सरकार निवडले गेले पाहिजे, आणि त्याच प्रमाणे ते लोकांच्या कल्याणाला बांधलेले असले पाहिजे. तेथेच खरी लोकशाही फलद्रुप होऊ शकते. राजकीय पद्धत म्हणून तर लोकशाही चांगली आहेच, पण ज्याचबरोबर जीवन जगण्याचा तो एक उत्कृष्ट मार्ग सुद्धा आहे. याचा अर्थ लोकशही केवळ राजकीय क्षेत्रातच नसते तर सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात देखील असते. " लोकशाहीच्या प्रस्तुत संकल्पनेतून गांधीजींच्या आदर्श लाकशाहीची कल्पना येते. या आदर्श लोकशाहीत त्यांनी लोकशाहीच्या आर्थिक स्वरूपाची तसेच लोकशाहीच्या सामाजिक स्वरूपाचे वर्णन केले आहे. याचा सखोल आणि तितक्याच गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे.

### गांधीजींना अपेक्षित लोकशाही आणि भारताचा विशेष संदर्भ -

"लोकशाही साध्य आहे तसेच साधनही आहे. म्हणजे लोकशाही प्राप्त करावयाला लोकशाहीच्या मार्गाची गरज असते आणि तसे झले तरच ती समर्थ बनू शकते. लोकशहीचे सामर्थ्य तिच्या नागरिकांत असते आणि ते त्यांना विशिष्ट तत्वे पाळून मिळवावे लागते. ही विशिष्ट तत्वे म्हणजेच लोकशहीची पंचशील आहेत". "जागरूकता, समता, साहिष्णुता, सक्रियता, शांतता ही लोकशाहीत ही पंचशीले लोप पावत असलेली दिसतात. गांधीजींनी अपेक्षित ग्रामोद्योग मूलक ग्रामस्वराज्य आज प्रत्यक्षात अस्तित्वात येणे आवश्यक आहे. कारण वर्तमान स्थित लघुउद्योग आणि ग्रामोद्योंकडे होणरे दुर्लक्ष अर्थव्यवस्थेच्या दीर्घकालीन ऱ्हासाला कारणीभुत ठरत आहे. नवीन आर्थिक धोरणने भांडवल साधन उद्योग, स्वयंचलित यंत्राने चालसणारे उद्योग यांना प्रोत्साहन मिळत असून गांधीजींच्या आर्थिक विकेंद्रीकरणची कल्पना हरवते आहे. या सर्वांमध्ये भांडवलशाहीत "स्पर्धा" आणि "नफा" हे परवलीचे शब्द आजे. त्यांच्या रेट्यामध्ये "योगदान" आणि "सामाजिक सेवा" हे घटक संपत चालले असुन विकास म्हणज केवेळ उत्पन्नवृद्धी नाही. याचे भन हरवत चालले आहे. पर्यावरण ऱ्हास आणि मुबलक वेस्ट या बाबीं नित्याच्या होऊ लागल्या आहेत. या सर्वांचे परिणाम स्वरूप आर्थिक, सामाजिक, स्वरूपाची वाढती विषमता याचमुळे "भारत" आणि "इंडिया" यामधील दरी जर भ्रावयाची असतेल तर गांधीजींच्या नैतिक अध्ष्ठिान असणाऱ्या लोकशहीला स्वीकारल्याशिवाय उपाय नाही.

### संदर्भ ग्रंथ सुची -

१) भारतीय राजकिय विचारवंत : कृ. दि. कोराळकर
२) आर्थिक विचारांचा इतिहास : डॉ. विजय कविमंडन
३) सुलभ राज्यशास्त्र : स. मा. गर्गे